// मराठी विज्ञान परिषद
विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, चुनाभट्टी, शीव (पूर्व), मुंबई - ४०० ०२२ दूरध्वनी : ०२२ २४०५ ४७१४, ०२२ २४०५ ७२६८
ई-मेल : office@mavipa.org संकेतस्थळ : www.mavipa.org

नोंदणी क्रमांक : सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट : BOM 81/66/GBBSD दिनांक : 12-8-1966
बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट : F-1429 (BOM) दिनांक : 06-09-1966 ■ PAN No : AAATM0981C
12-A (a) नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक: AAATM0981CE19662 दिनांक : 30-09-2021
आयकर सवलत 80-G प्रमाणपत्र क्रमांक AAATM0981CF20213 दिनांक : 24-09-2021 कायमस्वरूपी
परकीय चलनातील देणग्या स्विकारण्यास मान्यता प्रमाणपत्र क्रमांक – 084020008 दिनांक : 14-05-2017

**अध्यक्ष**
प्रा. ज्येष्ठराज जोशी

**उपाध्यक्ष**
प्रा. सुधीर पानसे
डॉ. स्मिता लेले
प्रा. संजय देऊळगावकर

**कार्यवाह**
श्री. अ. पां. देशपांडे
श्री. दिलीप हेर्लेकर
प्रा. भालचंद्र भणगे

**कोषाध्यक्ष**
डॉ. दिलीप साठे

**विश्वस्त**
डॉ. विजय केळकर
श्री. प्रमोद लेले
डॉ. वसुधा कामत
प्रा. सुहास पेडणेकर
डॉ. अश्विनी भालेराव गांधी
डॉ. अविनाश सुपे
श्री. रावसाहेब पाटील

**व्यवस्थापकीय संचालक**
श्री. राजेश समेळ

जावक क्रमांक : ००३/मविप/२०२५

## विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

मराठी विज्ञान परिषदेची “विशेष सर्वसाधारण सभा” रविवार दि. २७ एप्रिल २०२५ रोजी परिषदेच्या विज्ञान भवनात दुपारी २.३० वाजता होईल. सर्व सभासदांनी उपस्थित राहावे ही विनंती. प्रत्येक विभाग व संस्था सभासदाला आपला एक प्रतिनिधी अधिकार पत्र देऊन सभेस पाठवता येईल. गणसंख्येच्या अभावी सभा स्थगित झाल्यास त्याच ठिकाणी, त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता ही सभा भरेल. या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. (घटनेप्रमाणे गणसंख्या २०)

परिषदेच्या घटनेतील काही शब्द व कलमे बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा आणि भारत सरकारचा आयकर कायदा यातील तरतूदीनुसार बदलणे गरजेचे ठरले आहे. त्यासाठी ही विशेष सर्वसाधारण सभा बोलावली आहे.

**विषय**

१) घटनेत सुचवलेल्या बदलांना मान्यता देणे

सर्व संबंधीत बदलांची यादी सोबत जोडली आहे.

ज्येष्ठराज जोशी

**प्रा. ज्येष्ठराज जोशी**
अध्यक्ष

दि. ७ एप्रिल २०२५
मुंबई

| अनु. क्र. | कलम क्र. | तपशील : घटना २०२३ | कलम क्र. | प्रस्तावित बदल – घटना २०२५ |
|---|---|---|---|---|
| १. | १.०० | नाव:<br>या संस्थेचे नाव ‘मराठी विज्ञान परिषद’ असे आहे. तिचा उल्लेख ‘परिषद’ किंवा ‘मध्यवर्ती’ संस्था असा यापुढे केला आहे. | १.०० | नाव:<br>या संस्थेचे नाव ‘मराठी विज्ञान परिषद’ असे आहे. तिचा उल्लेख ‘परिषद’ असा यापुढे केला आहे. |
| २. | २.०० | कार्यालय:<br>परिषदेचे मुख्य कार्यालय मुंबई येथे राहील. | २.०० | कार्यालय:<br>परिषदेचे मुख्य कार्यालय मुंबई येथे राहील.<br>पत्ता पुढीलप्रमाणे<br>विज्ञान भवन, वि. ना.पुरव मार्ग, सायन-चुनाभट्टी, मुंबई - ४०० ०२२,<br>संकेत स्थळ - https://mavipa.org/<br>इमेल- office@mavipa.org |
| ३. | ४.१३ | स्थावर व जंगम मालमत्ता विकसित करणे, पुनर्विकसित करणे, विकत घेणे, विकणे, भाड्याने घेणे आणि देणे, व तारण ठेवणे. | ४.१३ | स्थावर व जंगम मालमत्ता विकसित करणे, पुनर्विकसित करणे धर्मादाय आयुक्तांच्या मान्यतेने स्थावर व जंगम मालमत्ता विकत घेणे, विकणे, भाड्याने घेणे आणि देणे, व तारण ठेवणे. |
| ४. | ५.०० | परिषदेचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील. | ५.०० | परिषदेचे कार्यालयीन कामकाजाचे वर्ष आणि आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील. |
| ५. | ६.००<br>६.०२<br>ब)<br>क)<br>ड)<br><br>इ)<br>फ) | सभासदत्व:<br>व्यक्ती सभासदांचे वर्ग<br>उपकर्ते<br>आश्रयदाते<br>हितचिंतक<br>वरील चारही वर्गांतील सभासद परिषदेचे आजीव सभासद असतील.<br>साधारण सभासद - वार्षिक<br>विद्यार्थी सभासद - वार्षिक | ६.००<br>६.०२<br>ब)<br>क)<br>ड)<br><br>इ)<br>फ) | सभासदत्व:<br>व्यक्ती सभासदांचे वर्ग<br>उपकर्ते ₹ २५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक<br>आश्रयदाते ₹ १०,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक<br>हितचिंतक ₹ ५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक<br>वरील चारही वर्गांतील सभासद परिषदेचे आजीव सभासद असतील.<br>साधारण सभासद - ₹ १००/- वार्षिक<br>विद्यार्थी सभासद – ₹ ५०/- वार्षिक |
| ६. | ६.०३<br>अ)<br>ब)<br>क)<br><br>ड)<br>इ) | संस्था सभासदांचे वर्ग<br>उपकर्ते<br>आश्रयदाते<br>हितचिंतक<br>वरील तीनही वर्गांतील सभासद परिषदेचे आजीव संस्था सभासद असतील.<br>साधारण संस्था सभासद - वार्षिक<br>संलग्न विभाग संस्था सभासद – वार्षिक (नियम १७.०३ अनुसार) | ६.०३<br>अ)<br>ब)<br>क)<br><br>ड)<br>इ) | संस्था सभासदांचे वर्ग<br>उपकर्ते ₹ ३०,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक<br>आश्रयदाते ₹ १५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक<br>हितचिंतक ₹ १०,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक<br>वरील तीनही वर्गांतील सभासद परिषदेचे आजीव संस्था सभासद असतील.<br>साधारण संस्था सभासद - ₹ ५००/- वार्षिक<br>संलग्न विभाग संस्था सभासद – ₹ ५००/- वार्षिक |
| ७. | ६.०४ | सर्व आजीव सभासद, आजीव संस्था सभासद, वार्षिक सभासद, वार्षिक संस्था सभासद यांची वर्गणी स्थायी समिती सभेत निश्चित केल्याप्रमाणे देणारे. | ६.०४ | सर्व आजीव सभासद, आजीव संस्था सभासद, वार्षिक सभासद, वार्षिक संस्था सभासद यांचे सभासद शुल्क स्थायी समिती सभेत निश्चित केल्याप्रमाणे देणारे. |
| ८. | ६.०५ | विद्यार्थी सभासद - १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेले व नियम १८.०० अनुसार स्थायी समिती सभेत निश्चित केली जाणारी वार्षिक वर्गणी देणारे विद्यार्थी. | ६.०५ | विद्यार्थी सभासद - १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेले व नियम १८.०० अनुसार स्थायी समिती सभेत निश्चित केले जाणारे वार्षिक सभासद शुल्क देणारे विद्यार्थी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | ६.०७ | परिषदेकडे आलेल्या सर्व अर्जांचा विचार स्थायी समिती करील व समितीने अर्ज संमत केल्यानंतर अर्जदाराला सभासदत्व प्राप्त होईल. सभासदत्वाचा अर्ज नामंजूर केल्यास त्याची कारणे दिली जाणार नाहीत. मात्र अर्जाबरोबरची वर्गणी परत केली जाईल. | ६.०७ | परिषदेकडे आलेल्या सर्व अर्जांचा विचार स्थायी समिती करील व समितीने अर्ज संमत केल्यानंतर अर्जदाराला सभासदत्व प्राप्त होईल. सभासदत्वाचा अर्ज नामंजूर केल्यास त्याची कारणे दिली जाणार नाहीत. मात्र अर्जाबरोबरचे सभासद शुल्क स्थायी समितीच्या निर्णयापासून दहा दिवसात परत केले जाईल. |
| १०. | ६.०९ | कोणत्याही सभासदाचे निधन झाल्यास / सभासद संस्थेचे विसर्जन झाल्यास किंवा सभासदाने राजीनामा दिल्यास किंवा त्याच्याविरुध्द अविश्वासाचा ठराव संमत झाल्यास त्याचे सभासदत्व संपुष्टात येईल. त्याशिवाय, कोणत्याही सभासदाची वर्गणी नियमांनुसार वेळेवर न आल्यास, त्यासाठी सभासदत्व मुदत वाढविण्याचा किंवा त्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी समितीला राहील. सभासदत्व संपले तरी त्याच्याकडून परिषदेला जी येणी असतील ती रद्द होणार नाहीत व दिलेली वर्गणी त्याला परत मिळणार नाही. | ६.०९ | कोणत्याही सभासदाचे निधन झाल्यास / सभासद संस्थेचे विसर्जन झाल्यास किंवा सभासदाने राजीनामा दिल्यास किंवा त्याच्याविरुध्द अविश्वासाचा ठराव संमत झाल्यास त्याचे सभासदत्व संपुष्टात येईल. त्याशिवाय, कोणत्याही सभासदाचे सभासद शुल्क नियमांनुसार वेळेवर न आल्यास, त्यासाठी सभासदत्व मुदत वाढविण्याचा किंवा त्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी समितीला राहील. सभासदत्व संपले तरी त्याच्याकडून परिषदेला जी येणी असतील ती रद्द होणार नाहीत व दिलेले सभासद शुल्क त्याला परत मिळणार नाही. |
| ११. | ६.१० | विज्ञानाची उच्च सेवा करणाऱ्या व्यक्तींना परिषदेचे सन्मान्य सभासदत्व देण्याचा कार्यकारी समितीला अधिकार राहील. हे सभासद आजीव सभासद मानले जातील व त्यांना वर्गणी द्यावी लागणार नाही. अशा सन्मान्य सभासदांची नेमणूक स्थायी समितीने बहुमताने सुचविल्याप्रमाणे झाली पाहिजे. दरवर्षी जास्तीत जास्त पाच व्यक्तींना सन्मान्य सभासदत्व देता येतील. | ६.१० | विज्ञानाची उच्च सेवा करणाऱ्या व्यक्तींना परिषदेचे सन्मान्य सभासदत्व देण्याचा कार्यकारी समितीला अधिकार राहील. हे सभासद आजीव सभासद मानले जातील व त्यांना सभासद शुल्क द्यावे लागणार नाही. अशा सन्मान्य सभासदांची नेमणूक स्थायी समितीने बहुमताने सुचविल्याप्रमाणे झाली पाहिजे. दरवर्षी जास्तीत जास्त पाच व्यक्तींना सन्मान्य सभासदत्व देता येतील. |
| १२. | ८.०१ ड) | नियमांनुसार वर्गणीचे नूतनीकरण केलेल्या प्रत्येक संलग्न विभाग संस्थेचा एक प्रतिनिधी. | ८.०१ ड) | नियमांनुसार सभासद शुल्काचे नूतनीकरण केलेल्या प्रत्येक संलग्न विभाग संस्थेचा एक प्रतिनिधी. |
| १३. | ८.१० | वार्षिक सर्वसाधारण सभा होण्याअगोदरच्या ३१ मार्च रोजी संलग्न असलेल्या आणि ३०एप्रिलपर्यंत चालू आर्थिक वर्षाची संस्था सभासदत्वाची वर्गणी भरलेल्या संलग्न विभाग संस्थांना कार्यकारी समितीत प्रतिनिधित्व मिळेल. | ८.१० | वार्षिक सर्वसाधारण सभा होण्याअगोदरच्या ३१ मार्च रोजी संलग्न असलेल्या आणि ३०एप्रिलपर्यंत चालू आर्थिक वर्षाची संस्था सभासदत्वाचे शुल्क भरलेल्या संलग्न विभाग संस्थांना कार्यकारी समितीत प्रतिनिधित्व मिळेल. |
| १४. | ९.०२ | परिषदेने तीन वर्षांसाठी निवडलेल्या बारा सभासदांमधून दोन उपाध्यक्ष, तीन कार्यवाह व एक कोषाध्यक्ष यांची निवड करणे. हे सहा जण आणि अध्यक्ष परिषदेचे पदाधिकारी मानले जातील. | ९.०२ | परिषदेने तीन वर्षांसाठी निवडलेल्या बारा सभासदांमधून दोन उपाध्यक्ष, तीन कार्यवाह व एक कोषाध्यक्ष यांची निवड करणे. हे सहा जण आणि अध्यक्ष परिषदेचे पदाधिकारी म्हणून ओळखले जातील. |
| १५. | ९.११ | परिषदेसाठी वर्गणी, देणग्या, अनुदाने, पारितोषिक निधी, बिनव्याजी ठेवी व कर्ज, वगैरे मिळवणे. | ९.११ | परिषदेसाठी सभासद शुल्क, वर्गणी, देणग्या, अनुदाने, पारितोषिक निधी, बिनव्याजी ठेवी व कर्ज, वगैरे मिळवणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६. | १०.०३ | सर्वसाधारण सभेची सूचना आणि कार्यक्रमपत्रिका, सर्व सभासदांना किमान पंधरा दिवसांच्या पूर्वसूचनेने पाठवण्यात येतील, अथवा परिषदेच्या संकेतस्थळावरून पंधरा दिवसआधी त्याची माहिती प्रसिद्ध केली जाईल. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेबरोबर वार्षिक वृत्तान्त, हिशेब पत्रके आणि पुढील वर्षाचे अंदाजपत्रक, निवडणुकीची सूचना, परिषदेस योग्य आणि सुलभ वाटेल त्या पद्धतीने पाठवण्यात येईल. | १०.०३ | सर्वसाधारण सभेची सूचना आणि कार्यक्रमपत्रिका, सर्व सभासदांना किमान पंधरा दिवसांच्या पूर्वसूचनेने पाठवण्यात येतील, अथवा परिषदेच्या संकेतस्थळावरून पंधरा दिवसआधी त्याची माहिती प्रसिद्ध केली जाईल. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेबरोबर वार्षिक वृत्तान्त, हिशेब पत्रके आणि पुढील वर्षाचे अंदाजपत्रक, निवडणुकीची सूचना टपालाद्वारे / कुरिअरद्वारे / इमेलद्वारे / व्हॉट्सॲपद्वारे अथवा परिषदेस योग्य आणि सुलभ वाटेल त्या पद्धतीने पाठवण्यात येईल. |
| १७. | १०.०७ | अविश्वासाचा ठराव, परिषदेच्या नियमांची दुरुस्ती, विश्वस्तांस पदांवरून काढणे, या विषयांखेरीज अन्य प्रश्नांवर सरळ मताधिक्याने सर्वसाधारण सभा निर्णय घेईल. मते समान पडल्यास सभेचे अध्यक्ष निर्णायक मत देतील. मत देणारा मतदार सर्वसाधारण सभेच्या अगोदरच्या ३१ मार्च रोजी परिषदेचा सभासद असला पाहिजे व सभेअगोदरील ३० एप्रिल रोजी त्याच्याकडून कोणतीही वर्गणी येणे बाकी असता कामा नये. | १०.०७ | अविश्वासाचा ठराव, परिषदेच्या नियमांची दुरुस्ती, विश्वस्तांस पदांवरून काढणे, या विषयांखेरीज अन्य प्रश्नांवर सरळ मताधिक्याने सर्वसाधारण सभा निर्णय घेईल. मते समान पडल्यास सभेचे अध्यक्ष निर्णायक मत देतील. मत देणारा मतदार सर्वसाधारण सभेच्या अगोदरच्या ३१ मार्च रोजी परिषदेचा सभासद असला पाहिजे व सभेअगोदरील ३० एप्रिल रोजी त्याच्याकडून कोणतीही सभासद शुल्क येणे बाकी असता कामा नये. |
| १८. | | | १०.०९ | सर्वसाधारण सभेत असंमत झालेली सूचना निदान ६ महिने पुन्हा विचारार्थ घेतली जाणार नाही. |
| १९. | १३.०२ | निवडणुकीसाठी मत देणारा मतदार हा वार्षिक सभेअगोदरील ३१ मार्च रोजी परिषदेचा म्हणजे मध्यवर्तीचा सभासद असला पाहिजे व सभेअगोदरील ३० एप्रिल रोजी त्याच्याकडून कोणतीही येणी बाकी नसावीत. निवडणुकीसाठी उभा राहणारा उमेदवार व त्याचे सूचक व अनुमोदक हे परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक आहे. | १३.०२ | निवडणुकीसाठी मत देणारा मतदार हा वार्षिक सभेअगोदरील ३१ मार्च रोजी परिषदेचा म्हणजे मध्यवर्तीचा सभासद असला पाहिजे व सभेअगोदरील ३० एप्रिल रोजी त्याच्याकडून कोणतीही येणी / सभासद शुल्क बाकी नसावे. निवडणुकीसाठी उभा राहणारा उमेदवार व त्याचे सूचक व अनुमोदक हे परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक आहे. |
| २०. | १५.०१ | परिषदेची घटना व नियम दुरुस्त करण्याचा सर्वसाधारण सभेला अधिकार राहील. परिषदेचे नाव किंवा उद्दिष्टे यांव्यतिरिक्त अन्य घटना व नियम दुरुस्त करावयाचे असल्यास, दुरुस्तीची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असली पाहिजे व ठराव करणारी सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली नसावी. उपस्थित सभासदांपैकी किमान २/३ सभासदांनी सूचनेच्या किंवा सभेत मांडलेल्या उपसूचनांच्या बाजूने मत दिल्यास, अशी सूचना व उपसूचना मंजूर होऊन त्यानुसार घटना व नियम दुरुस्त होतील. असंमत झालेली सूचना निदान ६ महिने पुन्हा विचारार्थ घेतली जाणार नाही. | १५.०१ | परिषदेची घटना व नियम दुरुस्त करण्याचा सर्वसाधारण सभेला अधिकार राहील. परिषदेची घटना व नियम दुरुस्त करावयाचे असल्यास, दुरुस्तीची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असली पाहिजे व ठराव करणारी सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली नसावी. उपस्थित सभासदांपैकी किमान २/३ सभासदांनी सूचनेच्या किंवा सभेत मांडलेल्या उपसूचनांच्या बाजूने मत दिल्यास, अशी सूचना व उपसूचना मंजूर होऊन त्यानुसार घटना व नियम दुरुस्त होतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१. | १६.०२ | आजीव सभासदांच्या वर्गणीचा किंवा आय-व्यय पत्रकातील खर्चापेक्षा जमा अधिक असल्यास, त्यातील शक्य तेवढा भाग राखीव निधीकडे वर्ग करण्यात येईल. सर्वसाधारण सभेने संमती दिलेल्या कोणत्याही कार्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल. | १६.०२ | आजीव सभासदांच्या शुल्काचा किंवा आय-व्यय पत्रकातील खर्चापेक्षा जमा अधिक असल्यास, त्यातील शक्य तेवढा भाग राखीव निधीकडे वर्ग करण्यात येईल. सर्वसाधारण सभेने संमती दिलेल्या कोणत्याही कार्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल.<br>परिषदेचे पैसे या परिषदेच्या उद्देशांसाठी खर्च करायचे आहेत आणि ते विशिष्ट व्यक्तींसाठी नसून समाजाच्या हितासाठी परिषद असल्याने परिषदेचा निधी/मालमत्ता फक्त परिषदेच्या उद्देशांसाठीच वापरली जाईल.<br>परिषदेच्या संपत्तीचा किंवा मालमत्तेचा कोणताही भाग विश्वस्त मंडळ अथवा वैयक्तीक विश्वस्तांना हस्तांतरित करता येणार नाही. |
| २२. | १६.०५ | परिषदेच्या निधींची गुंतवणूक ही आयकर कायदा १९६१च्या वेळोवेळी लागू असलेल्या कलमांनुसार असेल, तसेच ती धर्मादाय कायद्याच्या अंतर्गत मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० मध्ये प्रचलित कलमांच्या अन्वये मान्यताप्राप्त संस्थांमध्ये करण्यात येईल. | १६.०५ | विश्वस्तांना परिषदेची अतिरिक्त शिल्लक किंवा जमा अथवा संस्थेच्या कोणत्याही पैशाची गुंतवणूक भारतीय विश्वस्त कायदा, १८८२ च्या कलम २० आणि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा, १९५० च्या कलम ३५ अंतर्गत अधिकृत केलेल्या कोणत्याही सिक्युरिटीज किंवा गुंतवणुकीत करण्याचा अधिकार असेल तसेच ही गुंतवणूक आयकर कायद्याच्या कलम ११(५) अनुसार केली जाईल. |
| २३. | १७.०३ | विभाग संस्थांनी संलग्नता वर्गणी म्हणून त्या वर्षाच्या एप्रिल महिनाअखेरपर्यंत मराठी विज्ञान परिषदेस रक्कम पाठवावी. सदर रक्कम दरवर्षी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या स्थायी समिती सभेत ठरेल. | १७.०३ | विभाग संस्थांनी संलग्नता सभासद शुल्क म्हणून त्या वर्षाच्या एप्रिल महिनाअखेरपर्यंत मराठी विज्ञान परिषदेस रक्कम पाठवावी. |
| २४. | १८.०३ | विद्यार्थी सभासदांची वार्षिक वर्गणी, घटना व नियम क्र. ६.०५ अनुसार स्थायी समिती सभेत ठरेल. | १८.०३ | विद्यार्थी सभासदांची वार्षिक सभासद शुल्क, घटना व नियम क्र. ६.०५ अनुसार स्थायी समिती सभेत ठरेल. |
| २५. | २१.०० | विसर्जन<br>संस्था विसर्जन<br>ही संस्था निरंतरपणे चालू राहील. परंतु संस्था नोंदणी अधिनियमानुसार व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमानुसार परिषदेच्या विसर्जनाची सूचना सर्वसाधारण सभेत संमत झाल्यास, परिषदेच्या विसर्जनाची प्रक्रिया सुरू करता येईल. परिषदेचे विसर्जन होईल, त्यावेळी असलेली परिषदेची स्थावर आणि जंगम मालमत्ता समान उद्देशाने काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येईल किंवा परिषदेची सर्व मालमत्ता धर्मादाय आयुक्तांच्या आदेशानुसार जमा करण्यात येईल आणि त्यानंतर परिषदेचे विसर्जन होईल. | २१.००<br>२१.०१<br><br><br><br><br><br><br><br><br><br><br>२१.०२ | विसर्जन<br>संस्था विसर्जन<br>संस्था नोंदणी अधिनियमानुसार व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमानुसार परिषदेच्या विसर्जनाची सूचना सर्वसाधारण सभेत संमत झाल्यास, परिषदेच्या विसर्जनाची प्रक्रिया सुरू करता येईल. विसर्जनाच्या वेळी परिषदेची स्थावर आणि जंगम मालमत्ता परिषदेसारखीच उद्दिष्टे असलेल्या इतर नोंदणीकृत संस्थेकडे हस्तांतरित केली जाईल किंवा परिषदेची सर्व मालमत्ता धर्मादाय आयुक्तांच्या आदेशानुसार हस्तांतरित करण्यात येईल आणि त्यानंतर परिषदेचे विसर्जन होईल. अपरिवर्तनीय (इर्रिव्होकेबल)<br>परिषदेच्या या घटनेद्वारे निर्माण झालेला ट्रस्ट अपरिवर्तनीय आहे आणि तो अस्तित्वात राहील अशी स्पष्ट तरतूद केल्याची सहमती आहे. या संस्थेचे अस्तित्व कायम राहील. |